आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२५ जुलै २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ब्रिटनबरोबरचे संबंध वृद्धिंगत करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ग्वाही

- विरोधी पक्षाच्या नेत्यांनी जनादेशाचा अपमान केल्याची संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांची टीका/अर्थसंकल्पावर विरोधकांकडून अर्थपूर्ण चर्चेची अपेक्षा

- महाराष्ट्रात संततधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत/पुण्यात गेल्या चोवीस तासात चार जणांचा मृत्यू

- ख्यातनाम साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचं निधन

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिक २०२४ चा उदघाटन समारंभ उद्या होणार, त्यापूर्वी, स्पर्धेतली भारताची कामगिरी आज सुरु होणार

**<><><><><>**

ब्रिटनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री डेव्हिड लॅमी यांनी काल संध्याकाळी नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. ब्रिटनसोबतचे द्विपक्षीय संबंध अधिक वृद्धिंगत करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या भेटीनंतर सांगितलं.

डेव्हिड लॅमी यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचीही भेट घेतली. तसंच परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्याशी द्विपक्षीय

चर्चा केली. भारत आणि ब्रिटन दरम्यान २०२१ मध्ये व्हर्च्युअल समिटमध्ये झालेल्या कराराचा दोन्ही मंत्र्यांनी आढावा घेतला. दोन्ही देशांत झालेल्या व्यापार करारा संदर्भात यावेळी समाधान व्यक्त करण्यात आलं.

**<><><><><>**

विरोधी पक्षाच्या नेत्यांनी देशानं दिलेल्या जनादेशाचा अपमान केल्याची टीका  संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज केली. ते आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. अर्थसंकल्पावर अर्थपूर्ण चर्चा अपेक्षित असून, काही पक्षांच्या नेत्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे सभागृहाच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचल्याचं ते यावेळी म्हणाले. विरोधी पक्षांनी अर्थसंकल्पावर कोणतंही भाष्य न करता, केवळ राजकारण केल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेदरम्यान काल भाजपा सदस्य अभिजित गंगोपाध्याय यांनी केलेल्या वक्तव्या विरोधात काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसनं आज आक्षेप नोंदवला. सकाळी सदनाचं कामकाज सुरु झाल्यावर काँग्रेस आणि टीएमसीच्या सदस्यांनी गंगोपाध्याय यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी करत हा मुद्दा उपस्थित केला. गंगोपाध्याय यांचं वक्तव्य अयोग्य असून ते सभागृहाच्या प्रतिष्ठे विरोधात असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले. गंगोपाध्याय यांना त्यांच्या वक्तव्याबद्दल इशारा देण्यात आल्याचं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मैसूर नगर विकास प्राधिकरण घोटाळा प्रकरणी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज केली. ते आज संसद भवनाच्या प्रांगणात बातमीदारांशी बोलत होते. सिद्धरामय्या यांचा या घोटाळ्याशी थेट संबंध असल्याचा आरोप करत, हे प्रकरण सीबीआय कडे सोपवण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दहाव्या कम्युनिटी रेडियो पुरस्कारांची घोषणा केली. आयझॉल इथल्या अपना रेडिओ या पाचशेव्या कम्युनिटी रेडियो स्टेशनचं उद्घाटनही वैष्णव यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

पंचविसाव्या कारगील विजय दिना निमित्त, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या कारगील युद्ध स्मारकाला भेट देणार आहेत. आपलं कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या जवानांना ते श्रद्धांजली अर्पण करतील. यावेळी ते दूरस्थ पद्धतीनं शिंकुन-ला बोगदा प्रकल्पाचा पहिला सुरुंग स्फोटही करतील. निमू-पदुम-दारचा मार्गावर सुमारे पंधरा हजार ८०० फूट उंचीवर हा दुपदरी बोगदा बांधला जाणार असून, लेह या भागाशी कोणत्याही ऋतूत संपर्क साधण्यासाठी तो उपयोगी ठरेल.

शिंकुन-ला, हा जगातला सर्वात जास्त उंचीवरचा बोगदा असेल. आपल्या सशस्त्र दलांच्या आणि उपकरणांच्या जलद हालचालीसाठी तो उपयोगी ठरणार असून, लडाखच्या  आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना देईल.

**<><><><><>**

दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणी राऊज एव्हेन्यू न्यायालयानं दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत ८ ऑगस्टपर्यंत वाढ केली आहे. तिहार कारागृहातून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून केजरीवाल यांनी सुनावणीला हजेरी लावली. सर्वोच्च न्यायालयानं १२ जुलै रोजी ईडीनं दाखल केलेल्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात केजरीवाल यांना अंतरिम जामीन दिला होता. मात्र, याच प्रकरणात सीबीआयनं त्यांना अटक केल्यानं त्यांची रवानगी तिहार कारागृहात झाली होती.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या विविध भागात आज संततधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि पुण्याला हवामान विभागानं रेड अलर्ट जारी केला आहे.

**ठाणे** जिल्ह्यात रात्रीपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे कल्याण मुरबाड रस्ता बंद झाला आहे, उल्हास नदीच्या पाण्यानं रायता पुलावर प्रवेश केल्यामुळे पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. टिटवाळा-शहापूर, आणि पडघा-खडवली दरम्यानचे मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीतल्या सर्व शाळा बंद ठेवण्याचे आदेश प्रशासनानं दिले आहेत.

**रायगड** जिल्ह्याच्या महाड तालुक्यात काल रात्रीपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचलं आहे. जिल्ह्यातल्या सावित्री, कुंडलिका, आंबा या नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे.

**पुणे** जिल्ह्यातही मुसळधार पाऊस सुरू आहे. जिल्ह्यात गेल्या २४ तासांत पावसामुळे ४ जणांचा मृत्यू झाला आहे. सुरक्षिततेच्या कारणासाठी भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली हे तालुके आणि खडकवासला परिसर तसंच पुणे शहरातल्या शाळा आज बंद ठेवण्याचे आदेश जिल्हा प्रशासनानं दिले आहेत. ताम्हिणी घाटात मुळशी हद्दीमध्ये काही ठिकाणी तसेच माणगाव हद्दीत तीन ठिकाणी दरड कोसळल्याने हा मार्ग बंद झाला आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात राधानगरी धरणातून सुरू असलेल्या विसर्गामुळे पंचगंगेनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. जिल्ह्याला पुराचा धोका निर्माण झाल्यानं नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात येत आहे.

**राज्यातल्या पावसाच्या** स्थितीचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आढावा घेतला. आपत्ती व्यवस्थापनाच्या सर्व पथकांना सज्ज राहण्याचे त्यांनी आदेश दिले असून नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असेही आवाहन फडणवीस यांनी केलं आहे.

राज्यात होत असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयातून अतिवृष्टी आणि मदतकार्याचा आढावा घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार पुण्याकडे रवाना झाले आहेत.

मुंबई, पुणे, रायगड जिल्ह्यात अतिवृष्टी सुरू असून जिल्हा, महापालिका प्रशासन सज्ज आहे. जिथे पूरसदृश परिस्थिती आहे तिथे बचाव कार्य वेगानं सुरु आहे. नागरिकांनी देखील आवश्यकता असल्यास घराच्या बाहेर पडावं असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे.

**<><><><><>**

साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचं आज वसई इथं वृध्दापकाळानं निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद भूषविलं होतं. आनंदाचे अंतरंग - मदर तेरेसा, ओॲसिसच्या शोधात, ख्रिस्ताची गोष्ट, तेजाची पाऊले, मुलांचे बायबल, सृजनाचा मळा ही फ्रान्सिस दिब्रिटो यांची पुस्तकं, तसंच ‘नाही मी एकला’ हे त्यांचं आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.

आज संध्याकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, काँग्रेस नेते नाना पटोले यांनी फादर दिब्रिटो यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

जम्मूमधल्या भगवती नगर यात्री निवास बेस कॅम्प वरून आज पहाटे १०६ वाहनांच्या ताफ्यासह ३ हजार ८९ यात्रेकरूंची आणखी एक तुकडी अमरनाथ यात्रेसाठी काश्मीर खोऱ्याकडे रवाना झाली. यापैकी एक हजार २८६ यात्रेकरू बालताल बेस कॅम्पकडे, तर एक हजार ८०३ यात्रेकरू पहलगाम बेस कॅम्पकडे रवाना झाले. तिथून पुढे ते अमरनाथ गुंफेकडे मार्गस्थ होतील.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ चा उदघाटन समारंभ उद्या होणार असून, त्यापूर्वी, स्पर्धेतली भारताची कामगिरी आज सुरू होत आहे. भारतीय तिरंदाज तरुणदीप राय आणि प्रवीण जाधव यांच्यासह दीपिका कुमारी,

अंकिता भकट, भजन कौर, आणि बी. धीरज, वैयक्तिक रँकिंग फेरीत भाग घेतील. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी एक वाजता महिला रँकिंग फेरी सुरू होईल आणि त्यानंतर पुरुषांची रँकिंग फेरी संध्याकाळी पावणे सहा वाजता होणार आहे. स्पर्धेचे पुढले टप्पे २८ जुलै ते ४ ऑगस्ट या कालावधीत होणार आहेत.

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये तिरंदाजीच्या पाचही स्पर्धांमध्ये भारत सहभागी होणार आहे. स्पर्धेसाठी भारताचे एकूण १२८ तिरंदाज पात्र ठरले असून, यामध्ये ६४ महिला आणि ६४ पुरुष खेळाडूंचा समावेश आहे. यंदा, तिरंदाजीमधली पदकांची कमतरता भरून काढण्याचा भारतीय खेळाडूंचा निर्धार आहे.

**<><><><><>**

देशाच्या पश्चिम आणि मध्य भागात पुढले काही दिवस जोरदार ते अती जोरदार पावसाची शक्यता असून, महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, रायगड, पुणे परिसरासह, पालघर, रत्नागिरी, परभणी, अहमदनगर, धाराशिव, नांदेड, लातूर आणि साताऱ्याच्या घाट परिसरात पुढले काही तास अती जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**